तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९०००७.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

**शुध्दीपत्रक**

क्रमांक : 10/एनजीपी/मान्यता/2018-19/ ७२६
दिनांक : 4 JUL 2018

**विषय:- पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास, विद्यमान पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थेत पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे अथवा उलट करणे, सुरु असलेल्या पदविका/पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे, विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदविका/पदवी अभ्यासक्रमाच्या मान्यतेस मुदतवाढ यास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यतेबाबत...**

**संदर्भ:-या संचालनालयाचे पत्र क्रमांक** 10/एनजीपी/मान्यता/2018-19/721 दि. 03.07.2018.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रात नमुद करण्यात आलेले वाक्य "याबाबत संबंधित संस्था जबाबदार राहणार नाही" **ज्याऐवजी** "याबाबत संबंधित संस्था जबाबदार राहील" असे वाचण्यात यावे.

**(डॉ. सुभाष महाजन)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

**प्रत:- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.
2. कार्यासन क्रमांक 3, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर पत्र या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
3. संबंधित सर्व संस्था (संचालनालयाच्या संकेतस्थळावरुन) 4. कार्यासन क्रमांक 2 व 2अ, मुख्य कार्यालय, मुंबई

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
## ३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९०००७.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


तात्काळ/ईमेलव्दारे
कालमर्यादित दि. 09.07.2018

क्रमांक : 10/एनजीपी/मान्यता/2018-19/ 629
दिनांक : 3 JUL 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.

**विषयः- पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास, विद्यमान पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थेत पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे अथवा उलट करणे, सुरु असलेल्या पदविका/पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे, विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदविका/पदवी अभ्यासक्रमाच्या मान्यतेस मुदतवाढ यास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यतेबाबत...**

**संदर्भः-या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक 10/एनजीपी/मान्यता/2018-19/623 दि. 22.06.2018.**

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन परिपत्रकाचा अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, ज्या संस्थांना शैक्षणिक वर्ष 2018-19 पासुन/करिता पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास, विद्यमान पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थेत पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे अथवा उलट करणे, सुरु असलेल्या पदविका/पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ मिळालेल्या संस्थांनी संदर्भिय परिपत्रकात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

परतु, शैक्षणिक वर्ष 2018-19 पुर्वीच्या शासन मान्यता दिलेल्या परंतु **शैक्षणिक वर्ष 2018-19 करिता** फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाची (PCI) मान्यता न मिळालेल्या सर्व **पदविका औषधमिर्णाशास्त्र** संस्थाकडुन शैक्षणिक वर्ष 2018-19 च्या प्रवेश प्रक्रियेकरिता फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचे (PCI) मान्यता आवश्यक असुन सदर मान्यता पत्र आपल्या कार्यालयामार्फत या संचालनालयास तात्काळ सादर करणेबाबत कळविण्यात यावे. तसेच ज्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष 2018-19 करिता अद्यापपर्यंत फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता घेतलेली नाही त्यानी संदर्भिय परिपत्रकासोबत जोडण्यात आलेल्या 100/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र आपल्याकडे सादर करणेबाबत कळविण्यात यावे. सदर माहिती आपल्यास्तरावरुन एकत्रित संकलित ( PCI चे मान्तयता पत्र / हमीपत्रासह) करुन खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे एकत्रित माहिती तात्काळ **दि. 09/07/2018 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत** हार्ड कॉपी व excel sheet मधील सॉफ्ट कॉपी या संचालनालयाच्या desk10@dtemaharashtra.gov.in या ईमेलवर पाठविण्यात यावी, ही विनंती.

| Sr. No. | DTE Code | Name of Diploma Institute | Est. Year | Sanctioned Intake as per AICTE for A.Y. 2018-19 | PCI approval for 2018-19 (Yes/No) | If No- attached affidavit If Yes-attached PCI approval letter | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|

तसेच शैक्षणिक वर्ष 2018-19 करिता काही संस्थांना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या (PCI) मान्यतेबाबत मा. न्यायालयाचे आदेश दिले असल्यास त्याबाबत शेरा रकानात इत्यंभूत माहिती सादर करण्यात यावी. वर नमुद केल्यानुसार ज्या

संस्था शैक्षणिक वर्ष 2018-19 करिता फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता असलेले पत्र अथवा हमीपत्र वर नमुद कालावधीपर्यंत सादर करणार नाहीत, अशा संस्थांना शैक्षणिक वर्ष 2018-19 च्या प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्यात याणार नाही. याबाबत संबंधित संस्था जबाबदार राहणार नाही, यांची संबंधित संस्थांना नोंद घेणेबाबत आपल्यास्तरावरुन कळविण्यात यावे.

(डॉ. सुभाष महाजन)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

**प्रत:- माहिती व कार्यवाहीसाठी**

1. कार्यासन क्रमांक 3, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर पत्र या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
2. संबंधित सर्व संस्था (संचालनालयाच्या संकेतस्थळावरुन) 3. कार्यासन क्रमांक 2 व 2अ, मुख्य कार्यालय, मुंबई